# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:26.03.2026** **वारः गुरुवार**

1. राज्यात गुन्हेगारीत घट; न्यायव्यवस्थेत महाराष्ट्र आघाडीवर-मुख्यमंत्र्यांचं विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर
2. विधीमंडळाचं पुढील अधिवेशन 22 जूनपासून मुंबईत
3. शेतीसाठी कर्ज देण्यास टाळाटाळ करणाऱ्या बँकांमधील शासकीय ठेवी काढून घ्या- सातारा जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश
4. देशभरात 2 लाख ग्राहकांचं LPG वरून PNG कडे स्थलांतर आणि
5. गडचिरोली जिल्ह्यात आजवर 50 शरणागत नक्षल्यांवर नसबंदी खुली करण्याची शस्त्रक्रिया

**अधिवेशन-मुंबई**

राज्यात अंधश्रद्धा निर्मूलन, कायदा-सुव्यवस्थेचं बळकटीकरण, गुन्हेगारी नियंत्रण, सायबर गुन्ह्यांवर आळा आणि न्यायव्यवस्थेतील सुधारणा या सर्व क्षेत्रांत राज्य शासन व्यापक पातळीवर काम करत ठोस प्रगती साधत आहे. राज्यात गुन्हेगारीत घट झाली असून न्याय व्यवस्थेत महाराष्ट्र आघाडीवर असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत विरोधी पक्षांच्या वतीनं मांडण्यात आलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावाला सविस्तर उत्तर देताना सांगितलं.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पोलीस दलाचं सशक्तीकरण आणि जलद न्यायप्रक्रिया यावर भर देत राज्यातील सुरक्षाव्यवस्था अधिक सक्षम करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताची पारदर्शक आणि निष्पक्ष चौकशी करून सत्य समोर आणलं जाईल असंही त्यांनी ठामपणे सांगितलं. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा सविस्तर आढावा सादर करताना विविध विभागांसंदर्भातील उपस्थित झालेल्या प्रश्नांबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली.

भारतीय न्याय संहिता महाराष्ट्र सुधारणा विधेयक 2026 विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात एकमतानं मंजूर झालं. ॲसिड हल्ल्यातील पीडितेचं नाव उघड करू नये तसंच डिजिटल माध्यमांवर महिलेची बदनामी केली तर तो विनयभंग समजला जाईल अशा तरतुदी या विधेयकात आहेत. या तरतुदींबद्दल माहिती देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले...

**पहिलं अमेंडमेंट असं आहे की आपण आत्तापर्यंत बलात्कार किंवा तत्सम जे काही गुन्हे आहेत. या गुन्ह्यांमध्ये जी पीडिता आहे तिचं नाव डिस्क्लोज करत नाही असं आपल्या कायद्यामध्ये आहे. शक्ती कायद्यामध्ये त्याच्यासोबत आपण टाकलं होतं की एसिड व्हिक्टिमच ही नाव हे पब्लिश होऊ नये. तर आता आपण एसिड पिडितेचं नाव याच्यात येऊ नये. दुसरं अमेंडमेंट आहे की दूरध्वनी ईमेल सामाजिक माध्यम मंच किंवा इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक किंवा डिजिटल संवाद माध्यमाद्वारे अश्लील किंवा कामुक स्वरूपातील आक्षेपार्ह संवाद करणे स्त्रीच्या शरीराच्या कोणत्याही भागाचे वास्तविक किंवा बनावट चित्रण तसेच स्त्रीचा कोणत्याही लैंगिक कृत्यात सहभाग दर्शवणारा कोणताही ध्वनी किंवा दृश्य चित्रफीत ऑडिओ किंवा व्हिडिओ इलेक्ट्रॉनिक किंवा इतर**

**कोणत्याही माध्यमातनं अपलोड करण्याचीकिंवा प्रसारित करण्याची धमकी देणे हाही गुन्हा असेल त्याच संज्ञेतला म्हणजे त्याचं गांभीर्य आपण वाढवलेलं आहे अशा प्रकारचे दोनच अमेंडमेंट आहेत.**

**उपमुख्यमंत्री अंतिम आठवडा प्रस्ताव उत्तर**

नाशिकचं खरात प्रकरण हे संतापजनक, माणुसकीला काळिमा फासणारेच आहे, अशा भोंदूबाबांना शिक्षा करण्यासाठी कायदा आणखी भक्कम करायची गरज पडली, तर तो करू, असं आश्वासन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल विधानपरिषदेत विरोधी पक्षांनी मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना दिलं. विरोधी पक्षांनी सर्वसामान्यांचे प्रश्न मांडणं अपेक्षित असतं, पण ते दिसून आलं नाही. आमची भांडणं सोडवायला आम्ही समर्थ आहोत, असंही ते म्हणाले. नमो शेतकरी महासन्मान योजनेच्या आठव्या हप्त्याचा अठराशे कोटीचा निधी जवळपास 90 लाख शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाला असल्याची माहिती त्यांनी दिली. राज्याच्या तिजोरीवर सगळ्यात पहिला अधिकार बळीराजाचा आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली. सर्व महामंडळांना निधी द्यायला सरकार वचनबद्ध असल्याचंही ते म्हणाले. राज्यातील विविध महामंडळांच्या योजनांचं एकत्रीकरण करून त्या 'लाडकी बहिण' सारख्या योजनांशी जोडण्यासंदर्भात मुख्य सचिवांना निर्देश दिले जातील असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानपरिषदेत सांगितलं. सदस्य अभिजित वंजारी यांनी वसंतराव नाईक विमुक्त जाती आणि भटक्या जमाती विकास महामंडळावर थेटकर्ज योजना सुरू करण्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता.

**अंतिम-आठवडा-प्रस्ताव-विधानपरिषद**

राज्यात आज जर मंत्रीच संरक्षण मागत असतील, तर सर्वसामान्य नागरिकांनी काय करायचं, असा प्रश्न अनिल परब यांनी विधानपरिषदेत अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेला सुरुवात करताना उपस्थित केला. राज्यात अंमली पदार्थांचा वाढता विळखा, महिला सुरक्षा, बालकांवरचे अत्याचार, डिजिटल फसवणूक, डिजिटल अटक, अशोक खरात प्रकरण, पर्यावरणाचा ऱ्हास इत्यादी मुद्द्यांवरून त्यांनी सरकावर टीका केली. राज्यात कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर असल्याचं मत शशिकांत शिंदे यांनी मांडलं आणि जनतेला विश्वास वाटावा, असं राज्य निर्माण व्हावं, अशी अपेक्षा व्यक्त केली. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघातावर चर्चा करावी अशी विनंती वारंवार करूनही ती झाली नाही, यावर त्यांनी नाराजी व्यक्त केली. हा अपघात नसून घातपातच आहे, अशी खात्री असल्याचं ते म्हणाले. अभिजीत वंजारी, अमोल मिटकरी, सचिन अहिर, संजय खोडके, जगन्नाथ अभ्यंकर, राजेश राठोड यांनीही या चर्चेत भाग घेतला.

**संस्थगित**

विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन राष्ट्रगीतानंतर संस्थगित करण्यात आलं. पुढील अधिवेशन 22 जून 2026 रोजी मुंबईत होणार असल्याची घोषणा विधानपरिषदेत सभापती राम शिंदे यांनी तर विधानसभेत अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली. या अधिवेशनात विधानसभेत 22 शासकीय विधेयकं मंजूर झाली. अधिवेशन कालावधीत सदस्यांची उपस्थिती 58 टक्के नोंदवली गेली.

**मनरेगा**

राज्यात 2019 ते 2024 या कालावधीत मंजुरी मिळालेली मनरेगाची 27 टक्क्यांहून अधिक कामं सुरूच झाली नाहीत. साडे 19 टक्के कामं पूर्ण झाली नाहीत असा अहवाल कॅगनं काल प्रकाशित केला. राज्याचे प्रधान महालेखापाल डी. जयशंकर यांनी काल मुंबईत वार्ताहर परिषदेत सांगितलं की राज्यातल्या 75 टक्के कुटुंबांनी मनरेगाच्या कामांवर 50 दिवसांपेक्षा कमी दिवस काम केलं. केवळ पावणे 9 टक्के कुटुंबांनी 100 किंवा त्यापेक्षा जास्त दिवस काम केलं. इतर कामांची उपलब्धता, त्यातून मिळणारी अधिक मजुरी यामुळंही मजुरांनी मनरेगाच्या कामांकडं पाठ फिरवल्याचा अंदाज जयशंकर यांनी व्यक्त केला.

**कर्ज**

कृषी क्षेत्रासाठी शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्यास ज्या बँका टाळाटाळ किंवा हयगय करतील, अशा बँकांमधून शासकीय ठेवी तत्काळ काढून घेण्यात याव्यात. त्याऐवजी ज्या बँका कृषी, शासकीय योजना आणि उपक्रमांना प्राधान्यानं वित्तपुरवठा करतात, अशाच बँकांमध्ये शासकीय ठेवी ठेवण्याचे स्पष्ट निर्देश साताराचे जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी दिले आहेत. जिल्हा बँकर्स समितीच्या बैठकीत काल बोलताना ते म्हणाले की सन 2025-26 साठी पीक कर्ज वितरणाचं उद्दिष्ट 3800 कोटी रुपये आहे. यापैकी खरीप हंगामासाठी 2 हजार 111 कोटी रुपये पीक कर्ज वितरीत करण्यात आलं. रबीसाठी 1 हजार 475 कोटी रुपयांचं उद्दिष्ट असताना 15 मार्चअखेर केवळ 51 टक्के कर्ज वितरण करण्यात आल्याची माहिती पाटील यांनी दिली.

**गॅस-एनओए**

देशामध्ये 26 कोटी टन कच्च्या तेलावर प्रक्रिया करण्याची क्षमता उपलब्ध असल्याचं केंद्र सरकारनं काल स्पष्ट केलं. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवणं थांबवावं आणि घाबरून जाऊन वस्तूंची अतिरिक्त खरेदी करणं टाळावं, असं आवाहनदेखील सरकारनं केलं. पेट्रोल आणि डिझेलच्या दरात कोणतीही वाढ झालेली नाही. सर्व राज्यांमध्ये PNG जोडण्यांशी संबंधित अर्ज शुल्क आणि मंजुरीसाठी लागणारा कालावधी या प्रक्रिया सुलभ करण्याची अधिसूचना सरकारनं काढली आहे. गेल्या साधारण 25 दिवसांच्या कालावधीत, अडीच लाख नवीन जोडण्या देण्यात आल्या आहेत. याव्यतिरिक्त, 2 लाखांपेक्षा जास्त ग्राहकांनी LPG वरून PNG कडं स्थलांतर केल्याची माहिती काल देण्यात आली.

**नाशिक**

नाशिकमध्ये मध्यरात्रीपर्यंत पेट्रोल खरेदीसाठी रांगा लागल्या होत्या. मात्र कोणतीही टंचाई नसल्याचं स्पष्टीकरण जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दिलं आहे. पेट्रोल रेशनिंग करून मर्यादीत स्वरूपात पेट्रोल देणार अशी अफवा समाज माध्यमांवर पसरल्यानं नाशिक शहरासह जिल्ह्यातील अनेक पेट्रोल पंपांवर काल सायंकाळपासून रांगा लागल्या. त्यामुळं पोलिस बंदोबस्त वाढवावा लागला.

**जालना**

जालना जिल्ह्यात एलपीजी गॅस तसंच पेट्रोल-डिझेल टंचाई निर्माण झाल्याच्या अफवा पसरत आहेत. मात्र या अफवांमध्ये कोणतेही तथ्य नसून जिल्ह्यात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली आहे.

**गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्यात पोलिसांसमोर शरणागती पत्करलेल्या 14 नक्षल्यांची नसबंदी खुली करण्याची करण्याची शस्त्रक्रिया सर्च संस्थेच्या रुग्णालयात नुकतीच करण्यात आली. नक्षल चळवळीच्या नियमानुसार नक्षल दलममध्ये भरती होणाऱ्या सदस्यांची नसबंदी करण्यात येते. शरण आल्यानंतर त्यांना सांसारिक सुख उपभोगता यावं, यासाठी गडचिरोली पोलिस आणि 'सर्च' फाउंडेशननं यासाठी पुढाकार घेतला आहे. आतापर्यंत 50 आत्मसमर्पित नक्षल्यांची नसबंदी खुली करण्यात आली असून, पूर्वी नसबंदी खुली केलेल्या 36 आत्मसमर्पित नक्षल्यांपैकी 13 जणांना अपत्यंही प्राप्त झाली आहेत.

**रामनवमी**

आज श्रीरामनवमी निमित्त देशभरात उत्साह आणि भक्तीचं वातावरण सर्वत्र पाहायला मिळत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी यानिमित्त नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. देशभरात ठिकठिकाणी मंदिरांमध्ये विशेष पूजा, अभिषेक आणि आरतीचं आयोजन करण्यात आलं आहे. पहाटेपासूनच भाविकांनी मंदिरांमध्ये मोठ्या संख्येने गर्दी केली आहे.

अनेक ठिकाणी शोभायात्रा काढण्यात येत आहेत. पुण्यासह राज्यातील विविध शहरांमध्येही मोठ्या प्रमाणात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलं आहे. प्रशासनाकडून कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे.

बीड जिल्ह्यातील श्री क्षेत्र दादेगाव रामाचे इथं साधारण चारशे वर्षांपूर्वी श्री समर्थ रामदास स्वामींनी स्थापन केलेल्या राम मंदीरामध्ये गुढीपाडव्यापासून श्रीराम जन्मोत्सव साजरा केला जात आहे. या दरम्यान विविध कार्यक्रम तसंच अन्नदान महाप्रसादाचंही आयोजन करण्यात आलं. शिर्डी इथल्या श्री साईबाबा मंदिर आणि परिसरात विद्युत रोषणाई तसंच फुलांची आकर्षक सजावट केली आहे.

**<u>पाऊस-सांगली</u>**

सांगली आणि मिरज शहरासह जिल्ह्याच्या अनेक भागात काल सायंकाळी जोरदार पाऊस झाला. काही ठिकाणी विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला होता. काढणीला आलेल्या ज्वारी, गहू, हरभरा पिकाबरोबर फळ पिकांचं नुकसान झालं. सायंकाळी अचानक आलेल्या पावसामुळं नागरिकांची तारांबळ उडाली.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी विजांसह वादळ, हलका ते मध्यम पाऊस आणि ताशी 40-50 किलोमीटर वेगानं वारे वाहण्याची दाट शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**